# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
### प्रसिद्ध पत्रक

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत स्वच्छता हि सेवा या अभियानाअंतर्गत शहरात विविध उपक्रम सुरू**

गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय व भारत सरकार यांच्या निर्देशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा. प्र. से.] यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली दिनांक १७ सप्टेंबर ते दिनांक २ ऑक्टोबर पर्यंत स्वच्छता हि सेवा या अभियाना अंतर्गत **स्वच्छोत्सव** या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. मिरा भाईंदर शहरातील मोठ्या प्रमाणावर असलेली अस्वच्छ ठिकाणे साफ करण्यासाठी स्वच्छता मोहीम राबविणे या मोहिमेत नागरिकांचे समर्थन व सहभाग करून घेणे. तसेच स्वच्छता कामगारांच्या योगदानाची ओळख, स्वच्छता कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि कल्याण यांना प्राधान्य देणे. आणि पर्यावरण पूरक पद्धतीने उत्सव साजरे करणे हे स्वच्छता ही सेवा २०२५ या अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहे. स्वच्छोत्सव या उपक्रमाअंतर्गत दिनांक गुरुवार १८ सप्टेंबर २०२५ रोजी नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागातून बाईक रॅली काढण्यात आली होती. यावेळी स्वच्छतेचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला.

❖ **स्वच्छता ही सेवा (SHS) 2०25 अभियानाची प्रमुख घटक –**

१) अस्वच्छ ठिकाणांची स्वच्छता व त्याचे परिवर्तन (Transformation of Cleanlness Target Units, सार्वजनिक जागांची स्वच्छता (Clean Public Spaces)

२) सफाई मित्र सुरक्षा शिबीर (SafaiMitra Suraksha Shivirs)

३) स्वच्छ हरित महोत्सव (Clean Green Utsav)

४) श्री. स्वच्छता पुरस्कार (Advocacy For Swachhata)

❖ **स्वच्छोत्सव उपक्रमातील प्रमुख घटक –**

जन सहभाग. प्लास्टिक प्रदूषण कमी करण्याची जागरूकता मोहीम, घरोघरी जनजागृती, स्वच्छता रॅली, स्वच्छता शपथ, "स्वच्छोत्सव" स्पर्धा, शून्य कचरा कार्यक्रम राबविणे, RRR (Reduce, Reuse, Recycle) केंद्रे उभारणे, स्वच्छतेला प्रोत्साहन देण्यासाठी स्वच्छता धावण्याच्या स्पर्धा, सायकल शर्यती व मॅरेथॉनचे आयोजन करणे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमध्ये रस्ते, उड्डाणपूल येथे भित्ती चित्रे रेखाटणे व उद्यान सुशोभीकरण करणे, कार्यालये, शैक्षणिक संस्था, सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रमापूर्वी स्वच्छता प्रतिज्ञा घेणे, "वेस्ट टू आर्ट" उपक्रम राबविणे, खाद्य रस्ते स्वच्छ करणे. (Swachh Food Street)

❖ **एक दिवस, एक तास, एक साथः –**

एक दिवस, एक तास, एक साथ  माहिमेअतंर्गत प्रभात फेरी काढणे, सफाई मित्र आणि स्वच्छता कामगारांचा सन्मान करणे. असे उपक्रम स्वच्छता हि सेवा या अभियान पंधरवड्यात राबविणार आहेत. तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, शहरातील नागरिकांसाठी, सोसायटीसाठी, हॉटेलसाठी, विविध सामाजिक संस्थेसाठी स्टार रँकिंग स्पर्धा आयोजित केली असून त्यात अनेकांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला आहे. त्याचे बक्षीस वितरण समारंभ २ ऑक्टोबरला आयोजित करण्यात आला आहे. ज्यांनी स्वच्छता हि सेवा या अभियानात सहभाग नोंदवला नसेल त्यांनी आपला सहभाग नोंदवा आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या या स्वच्छोत्सवामध्ये मनापासून सहभागी होऊन हा उपक्रम यशस्वी करा, असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका मा.आयुक्तांनी केले आहे.

19/09/25